पोलीस अधीक्षक कार्यालय, पालघर.
जिल्हा मुख्यालय, कोळगाव, पालघर
दुरध्वनी – ०२५२५ - २५११००
E-mail: - sp.palghar@mahapolice.gmail.com

प्रेसनोट क्र. २२ दिनांक १७/०५/२०२४

# खूनाच्या गुन्ह्याची उकल करुन आरोपीस अटक करण्यात पालघर पोलीसांना यश.

दिनांक ०८/०५/२०२४ रोजी वाडा पोलीस ठाणे येथे फिर्यादी श्री. रघुनाथ काकडया बोचल वय ४८ वर्षे धंदा-शेती व मजुरी जात-आदिवासी वारली, रा.मांडवा तळयाचापाडा पो.गारगाव, ता.वाडा जि.पालघर यांनी फिर्याद दिली की, मयत अजय रघुनाथ बोचल वय-२६ वर्षे हा त्यांचा मुलगा आहे. यातील मयत हा त्याची पत्नी अनिता अजय बोचल व त्यांचा दिड वर्षाचा मुलगा वेदांत असे फिर्यादी यांचे सासु सासरे यांच्या घरात मौजे मांडवा तळयाचापाडा, पो.गारगाव ता.वाडा, जि.पालघर येथे झोपलेले असताना रात्रौ ०३.०० वाजताचे सुमारास कोणीतरी अज्ञात आरोपीत याने कोणत्यातरी अज्ञात कारणावरुन फिर्यादीचे मुलगा अजय रघुनाथ बोचल याचे डोक्यावर कोणत्यातरी हत्याराचे सहाय्याने गंभीर स्वरुपाची दुखापत करुन त्याला जिवे ठार मारुन त्याचा खून केला म्हणुन वाडा पोलीस ठाणे येथे I २२३/२०२४, भा.दं.वि.सं.कलम ३०२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर खुनाचे गुन्हयाचे गांर्भीय लक्षात घेवुन श्री. बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक, पालघर, श्री. पंकज शिरसाट, अपर पोलीस अधीक्षक, पालघर, श्री. गणपत पिंगळे, उप विभागीय पोलीस अधिकारी, डहाणू विभाग यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक, श्री. अनिल विभुते, स्थानिक गुन्हे शाखा, पालघर व पोलीस निरीक्षक श्री. दत्तात्रय किंद्रे, प्रभारी अधिकारी वाडा पोलीस ठाणे यांना तपास पथके तयार करून कारवाई करण्याबाबत सुचना दिल्या. त्याअनुषंगाने तपास पथक तयार केले. या गुन्ह्यात नक्की कोणाचा सहभाग आहे याचा तांत्रीक पध्दतीने शोध सुरु करुन मयत याचे मित्र, त्याचे सोबती यांचेकडे चौकशी केली. त्याचा कोणाशी वाद होता अगर कसे याबाबत माहिती घेतली परंतु कोणतेही धागेदोरे हाती लागले नाही. सदरचा गुन्हा रात्रीच्या वेळी ०३.०० वाजता घडलेला असल्याने व त्यादरम्यान घरातील इतर सर्व लोक घरातच हजर असल्याने घरातीलच कोणाचा हात आहे का. प्रेमप्रकरणाचा संबंध आहे का असा संशय आल्याने घरातील सर्व उपस्थित असणाऱ्या व्यक्तीची कसून चौकशी केली. यादरम्यान मयताची पत्नी अनिता अजय बोचल हिचेकडे कसून चौकशी केली असता तिने सदरचा गुन्हा केल्याचे कबुल केले आहे. सदर महिलेस अटक करण्यात आले असून गुन्ह्याचा पुढिल तपास हा पोलीस निरीक्षक श्री. दत्तात्रय किंद्रे, प्रभारी अधिकारी वाडा पोलीस ठाणे हे करीत आहेत.

सदरची कारवाई ही श्री. बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक, पालघर, श्री. पंकज शिरसाट, अपर पोलीस अधीक्षक, पालघर श्री. गणपत पिंगळे, उप विभागीय पोलीस अधिकारी, डहाणू विभाग यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक, श्री. अनिल विभुते, स्थानिक गुन्हे शाखा, पालघर, पोलीस निरीक्षक श्री. दत्तात्रय किंद्रे, प्रभारी अधिकारी वाडा पोलीस ठाणे, पोउपनि/गणपत सुळे, पोउपनि/स्वप्नील सावंतदेसाई नेमणुक स्थानिक गुन्हे शाखा, पालघर, पोउपनि/चंद्रकांत हाके, मपोउपनि/सुप्रिया मांढरे, पोउपनि/मयुर शेवाळे, पोउपनि/मयुरेश अंबाजी, मपोउपनि/पल्लवी बाणे, पोउपनि/विजय डाखोरे, पोउपनि/सागर मालकर, पोहवा/गुरुनाथ गोतारणे, पोहवा/विजय मढवी, पोशि/गजानन जाधव, पोशि/संतोष वाकचौरे, पोशि/भुषन खिलारे सर्व नेमणुक वाडा पोलीस ठाणे व स्थानिक गुन्हे शाखा, पालघर येथील पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे पथकाने यशस्वीरित्या पार पाडली आहे.